महाराष्ट्र टाइम्स CULTURE Club
आता नव्या रूपात!
ऑनलाईन सदस्यत्वासाठी खास पॅकेज
एका महिन्यासाठी - ₹ ७५
तीन महिन्यांसाठी - ₹ १४९
वर्षभरासाठी - ₹ ४९९
आजच लॉग इन करा www.mtcultureclub.com वर.
*नियम व अटी लागू.

महाराष्ट्र टाइम्स
# मुंबई TIMES
ADVERTORIAL, ENTERTAINMENT PROMOTIONAL FEATURE
मुंबई । शनिवार, ८ ऑगस्ट २०२०

# सॅनिटायजेशन तीन मिनिटांत

## आयआयटी मुंबईच्या प्राध्यापकांचं मोलाचं संशोधन

Niraj.Pandit@timesgroup.com
Tweet : @nirajcpanditMT

**‘कोव्हिड १९’ विरोधातील लढाईत आयआयटी मुंबईचे प्राध्यापकही महत्त्वाचा वाटा उचलत आहेत. तीन मिनिटांत एखाद्या केबिनचं निर्जंतुकीकरण करता येणारं उपकरण, नाकासाठी जेल ही त्यातलीच काही उदाहरणं.**

करोनाविरुद्ध लढताना सतत निर्जंतुकीकरण (सॅनिटायजेशन) करून घेणं आवश्यक झालं आहे. तीन मिनिटांत सॅनिटायजेशन करून देणारं उपकरण आयआयटी मुंबईच्या काही प्राध्यापकानं करून दाखवलं. तसंच नाकासाठी एक विशिष्ट जेल, रुग्ण शोधणारं ॲप हे शोधही महत्त्वाचे.


### अल्ट्राव्हायोलेटचा वापर

बायोसान्सेस ॲण्ड बायोइंजिनीअरिंग विभागाचे प्रा. अंबरिश कुंवर यांच्या टीमनं पोर्टेबल स्टरलायझेशन डिव्हाइस तयार केलं आहे. अल्ट्राव्हायोलेटचा वापर



करून अवघ्या तीन मिनिटांत एखाद्या केबिनचं निर्जंतुकीकरण करता येऊ शकणार आहे. याचा वापर मोबाइल फोन, तसंच अशा छोट्या उपकरणांचं निर्जंतुकीकरण करण्यासाठीही होऊ शकतो. याचा वापर आयआयटी मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये करण्यात आला आहे. याचबरोबर वाधवानी रिसर्च सेंटर फॉर बायोइंजिनीअरिंगच्या सहकार्यानं विभागानं एका रोबोचीही निर्मिती केली आहे.

### ई-कॉमर्स ॲप



प्रा. गणेश रामकृष्णन यांनी ‘लोकार्ट’ नावाचे ई-कॉमर्स सॉफ्टवेअर तयार केले आहे. याचा वापर करून छोट्या दुकानदारांना तसंच, शेतकऱ्यांना त्यांच्याकडील माल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यास मदत करता येऊ शकतं. यात सर्व प्रक्रिया ऑनलाइन होणार असून, हे ॲप मराठी आणि इंग्रजीत उपलब्ध आहे. हे ॲप वापरात आणण्यासाठी आयआयटीच्या माजी विद्यार्थ्यांचंही सहकार्य लाभले आहेत. सध्या या ॲपशी १९४ विक्रते जोडले गेलेले आहेत.

### असिम्प्टमॅटिक रुग्णांचा वेध

आपल्या आसपास असिम्प्टमॅटिक रुग्ण आहेत की नाही याचा शोध घेणं अवघड जातं. नेमके हे रुग्ण कुठे आहेत यांचा शोध घेण्यासाठी इंडस्ट्रीअल इंजिनीअरिंग अँड ऑपरेशनल रिसर्चचे प्रा. मंजेशकुमार हनवाल आणि कम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनीअरिंग विभागाचे प्रा. गणेश रामकृष्णन यांनी ‘कोरंटाइन’ नावाचा एक प्लॅटफॉर्म तयार केला आहे. या प्लॅटफॉर्मच्या आधारे एक ॲप तयार करण्यात आलंय. जीपीएसच्या आधारे, आपण आहोत या परिसरात असे कोणते रुग्ण आहेत का? याचा वेध घेता येऊ शकणार आहे. त्यांच्या या ॲपचा वापर मेघालय आणि ओरिसा सरकारनं करण्यास सुरुवात केली आहे. याचबरोबर या टीमनं ‘कॅम्पसहेल्प’ नावाचं एक ॲप तयार केले आहे, जे ब्लूट्यूथच्या साह्यानं कनेक्ट करून कोव्हिड पॉझिटीव्ह रुग्णांचा संपर्क शोधता येऊ शकतो. यात प्रा. मर्यम शेजाई यांनी एक मनगटी स्मार्ट वॉचही तयार करण्यात आले आहे. ज्याचा वापर करून ताप, ऑक्सिजनची पातळी आणि रक्तदाब तपासता येणार आहे.

### नाकासाठी जेल




कोव्हिड-१९ विषाणू हा नाकाद्वारे तसंच कानाद्वारे प्रवास करत असल्याचं संशोधानातून समोर आलं आहे. या विषाणूचा प्रवास वेळीच थांबवण्यासाठी बायोसान्सेस ॲण्ड बायो इंजिनीअरिंग विभागाचे प्रा. किरण कोडाबगील यांनी एक जेल तयार केलं आहे. नाकात ते एका स्प्रेच्या सहाय्यानं घेता येऊ शकतं. ज्याचा वापर करून आपण विषाणूचा प्रवास रोखण्यासाठी मदत करू शकतो. याची चाचणी सध्या सुरू आहे. याच विभागातील प्राध्यापक संजीवा श्रीवास्तव यांनी नाकातून स्वॅब करताना रुग्णाची प्रोटीनची पातळी ओळखण्याची पद्धत विकसित केली आहे. यामुळे योग्य प्रकारचे उपचार करणं शक्य होणार आहे.



kalpeshraj.kubal@timesgroup.com
Tweet : @KalpeshrajMT

# नका उचलू टोकाचं पाऊल!

## सिनेसंघटनांचं कलाकारांना आवाहन

**एकामागोमाग एक कलाकारांच्या आत्महत्या होऊ लागल्यानं मनोरंजनसृष्टी हादरली आहे. मुंबईत एकटे राहणाऱ्या आणि निराशेच्या गर्तेत अडकत चाललेल्या कलाकारांसाठी ‘सिंटा’सारख्या संघटनांनी पुढाकार घेतला असून, कलाकारांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.**

बॉलिवूड स्टार सुशांतसिंहच्या जाण्यानं मोठा धक्का बसलेल्या मनोरंजनसृष्टीला अजूनही एकामागोमाग एक धक्के बसताहेत. मनमित गरेवाल, प्रेक्षा मेहता, कुशल पंजाबी, आशुतोष भाकरे, अनुपमा पाठक, समीर शर्मा या कलाकारांच्या अकाली निघून जाण्यानं हळहळ व्यक्त होतेय. सिनेसंघटनांनी या दुर्दैवी घटनांची गंभीर दखल घेतली असून, मुंबईत एकटे राहणारे कलाकार निराशेच्या गर्तेत अडकू नयेत, याकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत कामासाठी आलेले कलाकार आपल्या कुटुंबापासून लांब राहतात. करोनाच्या संकटकाळात बहुतेकांच्या हाताला काम नाहीय. दुसरीकडे खर्चाचा आकडा कमी होत नाही. अशा कलाकारांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न कलाकारांच्या संघटनांकडून येत्या काळात प्रकर्षानं केला जाणार आहे. मनोरंजनसृष्टीनं एकत्र येऊन; कलाकारांच्या अडचणींबाबत एकमेकांशी खुलेपणानं बोलायला हवं, असा सूर इंडस्ट्रीतून उमटताना दिसतोय. करोनाचा संसर्ग रोखता यावा म्हणून काही अटी-शर्तींच्या चौकटीत मनोरंजनविश्वात चित्रीकरणाचं काम सुरू आहे. कलाकार, सिनेकर्मचारी आणि क्रूच्या एकूण मूळ संख्येपेक्षा केवळ ३३ टक्केच लोक सेटवर काम करण्याला परवानगी देण्यात आली आहे. परिणामी उर्वरित ६७ टक्के लोक अद्यापही बेरोजगार आहे. हाताला काम नसल्यानं अनेकांना नैराश्यानं ग्रासलं आहे. सुशांतच्या आत्महत्येनंतर आता, गेल्या चार-पाच महिन्यात झालेल्या इतर कलाकारांच्या आत्महत्यांच्या घटनांकडेही गांभीर्यानं पाहिलं जाऊ लागलंय. केवळ मनोरंजनसृष्टीपुरतीच ही चर्चा मर्यादित राहिलेली नसून, सर्वसामान्य लोकही त्याविषयी बोलताहेत.

### कलाकारांना आवाहन

नैराश्य, चिंता, काळजी, अस्वस्थता, ताणतणावांचं प्रमाण सध्याच्या परिस्थितीत सातत्यानं वाढते आहे. कलाकार जर बोलता झाला आणि मनातल्या गोष्टी त्यानं त्यांच्या जवळच्या व्यक्तीला किंवा आम्हाला (सिंटा) सांगितल्या, तर नक्कीच त्यातून मार्ग काढता येईल. नैराश्याची जाणीव योग्य वेळी झाल्यास संवाद साधून त्याला त्यातून नक्कीच बाहेर काढता येईल. करोना पार्श्वभूमीवर सर्वच क्षेत्रात निराशेचं वातावरण आहे. परंतु, धैर्यानं सामोरं जाऊन परिस्थितीशी लढता येईल. कलाकारांच्या अस्वस्थतेचा क्षण योग्य वेळी हेरला गेला, तर आत्महत्येसारखे टोकाचे प्रकार रोखले जाऊ शकतील. त्यासाठी आमचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत; असं आश्वासन ज्येष्ठ अभिनेते आणि 'सिंटा'चे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज जोशी यांनी 'मुंटा'च्या माध्यमातून कलाकारांना दिलं आहे.

कलाकारांनी आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल उचलू नये, म्हणून या निराशेच्या काळात यातून मार्ग काढण्यासाठी 'सिंटा', अर्थात 'सिने अँड टेलिव्हिजन आर्टिस्टस असोसिएशन'नं हालचाल सुरू केली आहे. लवकरच त्यांच्या सदस्यांची एक बैठक होणार असून त्यात प्रामुख्यानं याच विषयावरील उपाययोजनांवर विचार केला जाणार आहे. गेले चार महिने 'सिंटा'ने कलाकारांच्या मदतीसाठी पुढाकार घेऊन काम करत आहेच. परंतु, आता अधिकाधिक कलाकारांपर्यंत पोहोचण्याची गरज असल्याचं 'सिंटा'कडून सांगण्यात आलं.



घडणाऱ्या घटना दुर्दैवी आहेत. त्या घडायला नकोत. त्यासाठी एकमेकांशी संवाद असणं अत्यंत आवश्यक आहे. मी किंवा माझ्यासारखे इतर निर्मातेही अस्वस्थ आहेत. त्यामुळे आम्ही एकत्र येऊन येत्या दिवसात बैठक घेणार आहोत. काही पर्याय विचाराधीन आहेत. कलाकारांशी समन्वय साधण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

– जेडी मजीठिया, इंडियन फिल्म्स अँड टेलिव्हीजन प्रोड्यूसर्स काऊन्सिल, चेअरमन : टीव्ही विंग



मालिकांमध्ये काम करणाऱ्या कलाकारांना त्यांच्या कामाचं मानधन नव्वद दिवसांनंतर न देता दर महिन्याला दिलं जावं, अशी मागणी ‘सिंटा’नं निर्मात्यांकडे आणि वाहिन्यांकडे केली होती. निर्माते, ब्रॉडकास्टर्स, विविध संघटना यांची एकत्रित बैठक घेऊन निर्मात्यांनी दर महिन्याला मानधन देण्याची तयारी दर्शवली. कलाकारांची यापूर्वी बाकी असलेली रक्कमही देण्यात येईल. प्रत्यक्षात मात्र काही निर्मात्यांनी तसं केलं नाही. निर्मात्यांनीदेखील मानधनाचा विषय गांभीर्यानं घेतल्यास कलाकारांना आर्थिक चणचण भासून त्यांना नैराश्य येणार नाही.

– मनोज जोशी, ज्येष्ठ कलाकार (वरिष्ठ उपाध्यक्ष - सिंटा)



## मिर्चमसाला

### युपीएससीत चमकली

काही दिवसांपूर्वी युपीएससीचा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत प्रसिद्ध मॉडेल ऐश्वर्या श्योराणने बाजी मारली आहे. 'फेमिना मिस इंडिया-२०१६' सौंदर्यस्पर्धेच्या अंतिम फेरीपर्यंत पोहोचलेल्या ऐश्वर्याने युपीएससी परीक्षेत ९१वा क्रमांक पटकावला आहे. सध्या सोशल मीडियाद्वारे तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तिच्या नावावर कम्पस प्रिंसेस दिल्ली-२०१६ आणि फ्रेशफेस-२०१५ ही देखील टायटल्स आहेत. नागरी सेवा परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल तिचं मनोरंजन आणि मॉडेलिंग विश्वातून कौतुक होत आहे. युपीएससी परीक्षेत यश मिळवणं सोप नसतं. पण, तिनं पहिल्या प्रयत्नांतच हे यश संपादन केलं आहे

### ‘नागिन’बाबत उत्सुकता



छोट्या पडद्यावर ‘नागिन’ खूप लोकप्रिय ठरली. ‘नागिन ५’ हा नवा सीझन येत्या सोमवारपासून प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. या नव्या सीझनमध्ये हिना खान नागिनच्या भूमिकेत आहे. निर्मात्यांनी ‘नागिन ५त’ची एक छोटीशी क्लिप शेअर करत हिनाची झलक दाखवली आहे. हिना या भूमिकेसाठी उत्सुक असून, तिनं इन्स्टाग्राम स्टोरीवर शूट लोकेशनचे काही फोटो, व्हिडीओही शेअर केले आहेत. यात ती नागिनच्या कॉश्च्युममध्ये दिसतेय.

### डान्सर्सना मदत



करोनामुळे उद्भवलेल्या कठीण काळामुळे मनोरंजनसृष्टीतील अनेकांचा रोजगार थांबला. अनेक स्टार्सनी स्वतःहून पुढे येत त्यांना मदत केली. अलीकडे अभिनेता जॅकी भगनानीनं ऑल इंडिया फिल्म टेलिव्हिजन अँड इव्हेंट्स डान्सर असोसिएशनच्या सदस्यांना जीवनावश्यक गोष्टींचा पुरवठा केला. गेल्या अनेक महिन्यांपासून इव्हेंट्स होत नसल्यामुळे, पोटाची खळगी कशी भरायची? असा प्रश्न नृत्य करणाऱ्यांसमोर होता. त्यांना यामुळे काही अंशी दिलासा मिळाला आहे.

# घरबसल्या साधा दिग्गजांशी संवाद

मुंबई टाइम्स टीम
muntainbox@gmail.com


शॉर्टफिल्मची निर्मिती करणाऱ्यांसाठी हक्काचं व्यासपीठ उपलब्ध करुन देणारा फेस्टिव्हल म्हणजे बेंगळुरु इंटरनॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल (BISFF). यावर्षी हा फेस्टिव्हल १३ ते १६ ऑगस्ट दरम्यान रंगणार असून करोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन आयोजित केला जाणार आहे.

बीआयएसएफएफ हा शॉर्टफिल्म फेस्टिव्हल इंटरनॅशनल, इंडियन, कर्नाटका, ॲनिमेशन आणि लेट्स इन्क्लुड यासारख्या विविध विभागांत होणार आहे. प्रत्येक विभागातील विजेत्यांची निवड तज्ज्ञ करतील. सुसंवाद, चर्चासत्र आणि कार्यशाळांच्या माध्यमातून विविध जाणकारांकडून माहिती मिळवण्याची संधी आहे. काही महिन्यांपूर्वी या फेस्टिव्हलला ऑस्करकडून मान्यता मिळाली आहे. तुम्ही घरबसल्या या फेस्टिव्हलमध्ये सहभागी होऊ शकता. अधिक माहितीसाठी www.bisff.in या संकेतस्थळावर भेट देता येईल.

सध्याच्या परिस्थितीचा अंदाज घेता आम्ही फेस्टिव्हल ऑनलाइन करण्याचा निर्णय घेतलाय. फेस्टिव्हलच्या डिजिटल स्वरुपामुळे आम्हाला फिल्म इंडस्ट्रीमधील अनेक दिग्गजांपर्यंत पोहोचता आलं, त्यांनी त्यांच्या घरातूनच इतरांशी सुसंवाद साधण्याची तयारी दर्शवली.

– आनंद वरदराज, फेस्टिव्हल डायरेक्टर

आधी



नंतर



# आठवणींचा वटवृक्ष कोसळला

ऋषिकेश पवार,
सर जे.जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट
muntainbox@gmail.com

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मुंबईतील अनेक वृक्ष उन्मळून पडले. कलांचं माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जे जे स्कूल ऑफ आर्टच्या हिरव्यागार परिसरातही अनेक झाडंही जमीनदोस्त झाली आहेत. सुमारे १०० वर्षांपासून असलेला एक वृक्षही कोसळल्यानं जे जेचे आजी-माजी विद्यार्थी हळवे झाले आहेत. जे जेच्या कँटिनजवळच हा वृक्ष होता. जे जेतील अनेक होतकरू कलाकारांसाठी हक्काची सावली ठरणारा हा वृक्ष कोसळल्यामुळे अनेकांना अश्रू अनावर झाले. सुप्रसिद्ध दिग्दर्शक रवी जाधव यांनीही या झाडाच्या आठवणी सोशल मीडियावर शेअर करत दुःख व्यक्त केलं आहे.

जे जेच्या कॅम्पसमध्ये असलेली हिरवाई हे इथलं एक प्रमुख आकर्षण आहे. कॅम्पसमध्ये दिमाखात उभ्या असलेल्या झाडांशी विद्यार्थ्यांचं आपुलकीचं नातं आहे. त्यातलाच एक मुख्य हा कँटिननजिकचा वृक्ष होता. जे जेचा कट्टा असं त्याला म्हटलं जायचं. जे जेकरांचा हक्काचा कट्टा असलेल्या या झाडाखाली कॉलेजमधले कित्येक डे, सण साजरे व्हायचे. त्या कट्ट्यावर बेन्जो वाजायचा, विद्यार्थी तिथे क्रिकेट आणि चुंगी खेळायचे. काही विद्यार्थी कँटिनमध्ये बसण्याऐवजी या झाडाखाली बसून जेवायचे.

या वडाच्या झाडाच्या खोडामध्ये कित्येक कलाकारांनी काही कलाकृती बनवल्या होत्या. कलाकारांच्या सान्निध्यात राहून हे झाड स्वतःच एक कलाकृती होऊन गेलं होतं, असं जेजेचे विद्यार्थी सांगतात. जे.जे.चे आजी-माजी विद्यार्थी या झाडांच्या कोसळण्याबद्दल सोशल मीडियावर दुःख व्यक्त करत आहेत. जे जेचा माजी विद्यार्थी नील सालेकरनं सोशल मीडियावर व्हिडीओरुपानं या वृक्षाला श्रद्धांजली वाहिली.



कॅम्पसमधील झाडं उन्मळून पडणं हे खूप वाईट झालं. वृक्ष हे जे जे कॅम्पसचं सौंदर्य आहे. कॅम्पसमध्ये एवढे वृक्ष पडण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्यातून कँटिनजवळचा वटवृक्ष हा तर सर्वांचा जिव्हाळ्याचा विषय. तज्ज्ञांकडून माहिती घेऊन आता पुन्हा कोणते वृक्ष लावता येतील त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कॅम्पसमध्ये कडूलिंब, वड, पिंपळ यासारखे आपल्या मातीत व वातावरणात टिकाव धरणारे वृक्ष लावण्याचा मानस आहे. माजी विद्यार्थ्यांचीदेखील मदत होईलच. याआधीही जिजीभॉय यांच्या जयंतीनिमित्तानं वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला होता. कॅम्पसमध्ये विद्यार्थी आणि आम्ही मिळून वृक्ष जगवू.

– प्रा. विश्वनाथ साबळे, अधिष्ठाता, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट

# सांगा तुमचं संशोधनातील यश



**संशोधन** हे आपल्या देशातील एक महत्त्वपूर्ण क्षेत्र. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये खूप विविध प्रकारचं संशोधन सध्या सुरू आहे. हजारो अभ्यासू तरुण-तरुणी या क्षेत्रात खूप मोलाचं काम करत आहेत. मग ते विज्ञान असेल, विविध कला असतील...त्यात होणारं संशोधन त्या-त्या क्षेत्राला वेगळी दिशा देणारं ठरतं. लॉकडाउनमध्ये मिळालेल्या मोकळ्या वेळेत संशोधनाविषयी काही महत्त्वाचं काम झालेलं असू शकतं. तुम्ही त्यापैकी एक असाल, किंवा अशा तरुण संशोधकांविषयी, त्यांच्या महत्त्वाच्या संशोधनाविषयी तुम्हाला माहिती असेल, ती ‘मुंटा’ला (नाव, संपर्कक्रमांकासह) थोडक्यात कळवा. योग्य त्या संशोधनाची ‘मुंटा’मध्ये जरुर दखल घेतली जाईल.
muntainbox@gmail.com

# विनोदाचा अतिरेक? आरोप मान्य आहे!

Harshal.Malekar@timesgroup.com
Tweet : @HarshalmMT



**आपल्या भन्नाट कॉमेडीनं अभिनेता समीर चौघुले टीव्हीवर सध्या हास्याची जत्रा भरवताना दिसतोय. ‘विनोदाचा अतिरेक होतोय असं काही वेळा माझ्या बाबतीत बोललं जातं. पण, हा आरोप असेल, तर तो मला आनंदानं मान्य आहे’, असं तो म्हणतो. त्याच्याशी झालेल्या या गप्पा.**

**० टीव्हीवरील तुझ्या भन्नाट कॉमेडीचं सध्या खूप कौतुक होतंय. ही विविधता कुठून आणतोस?**

मी सिच्युएशनल कॉमेडी करतो. त्यातल्या प्रसंगाला अनुरुप काय करता येईल याचा विचार मी सतत करतो. विनोद करायचा असेल, तर त्यासाठी तुमच्याकडे उत्तम निरीक्षण शक्ती असायला हवी. आपल्या आजुबाजूला असणाऱ्या, आपल्याला भेटणाऱ्या व्यक्तींचं मी सतत निरीक्षण करत असतो. लोकांची चालण्याची ढब, बोलणं, चेहऱ्यावरील हावभाव या गोष्टी मी टिपत राहतो. विविध व्यक्तिरेखा साकारताना त्याचा मला खूप उपयोग होतो. मी स्वतः लेखक असल्यानं समाजातल्या विसंगती टिपत राहतो. आपल्यापैकी प्रत्येकाच्या आयुष्यात येणारे छोटे-छोटे, साधे प्रसंग यांचा विनोदनिर्मितीसाठी कसा उपयोग करता येईल याचा विचार सतत सुरू असतो.

**० सतत कॉमेडी करत राहून विनोदाचा अतिरेक होतोय असं वाटत नाही का?**

होय, कधीतरी वाटतं खरं. मलाही कधीतरी मेंटल ब्लॉक येतो. मुळात कॉमेडी करणं खूप कठीण आहे. इथे तुम्हाला सतत नवीन काहीतरी द्यायचं असतं. कॉमेडी करताना नेहमी वैविध्य द्यावं लागतं. आजवर अडीच-तीन हजार स्किट्स मी लिहिल्या आहेत. पण, मध्यंतरी चार वर्षांपूर्वी असं झालं होतं, की मला काही सुचतच नव्हतं. मग मी ‘आविष्कार’च्या नाटकासाठी काही काळ बॅकस्टेजला काम केलं. त्यांच्या नाटकात एक छोटी भूमिका केली. त्यातून ताजाजवाना होत पुन्हा कामाला सुरुवात केली. विनोद करताना रोज वेगळा विचार करावा लागतो. मला लोकांना हसवायला आवडतं. लोकांना हसवण्यावरुन ज्या प्रतिक्रिया मला येतात, त्यामुळे खूप आनंद होतो. दिग्गज मंडळींकडून कौतुक होतं. त्यामुळे काही वेळा विनोदाचा अतिरेक होतोय, हा आरोप होत असेल, तर तो मला अगदी आनंदानं मान्य आहे.

**लोकांकडे हल्ली वेळ फार कमी आहे. त्यामुळे त्यांना झटपट छोटंसं मनोरंजनच हवं असतं.**

**एखाद्याचा रंग, व्यंग यावरुन होणारे विनोद दुखावणारे असूनही त्याचा समावेश स्किटमध्ये का केला जातो? विनोदाचा दर्जा खालावलाय असाही आरोप नेहमी होतो...**

बॉडी शेमिंग आपल्याकडे नवीन नाही. हे काही मी सुरू केलेलं नाही. खुद्द पु.ल.देशपांडे यांनी स्वतःवर विनोद केले आहेत. चार्ली चॅप्लिननं स्वतःच्याच मूर्खपणावरुन विनोद केला आहे. स्वतःवर केलेला विनोद हा सर्वश्रेष्ठ असतो. मी जर जाडा असेन, मला जर टक्कल असेल, तर ते मी खिलाडूवृत्तीनं का घेऊ नये? अर्थात, अशा विनोदांना मर्यादा मात्र असली पाहिजे. येता जाता असा एखादा विनोद ठीक आहे, पण विनोदाचा मुख्य विषय तोच असता कामा नये. विनोदाचा दर्जा खालावलाय हे आरोप प्रत्येक पिढीवर होत आले आहेत. लोकांना काय आवडेल ते तुम्ही नाही ठरवू शकत. पिढी बदलली, तसा विनोदही बदलत गेलाय. दुसरं असं, की लोक आता खूप बिझी झाले आहेत. त्यांच्याकडे वेळ फार कमी आहे. त्यामुळे त्यांना आता छोटंसं मनोरंजन हवं असतं. १०-१५ मिनिटांचंच झटपट मनोरंजन त्यांना आवडतं. जो कलाकार त्यानुसार स्वतःला अपग्रेड करतो तो टिकतो.

**तू नाटकात-सिनेमात कामं केलीस. पण, तरीही अभिनेता म्हणून तू विशिष्ट चौकटीपलीकडे गेला नाहीस. असं का?**

हे मला मान्य आहे. विनोदी अभिनेता म्हणूनच मला अधिक मान्यता मिळाली. माझं अर्थार्जन यावर अवलंबून आहे. त्यामुळे मी ते करत राहिलो आणि काही भूमिका माझ्याकडून करायच्या राहिल्या. माझ्या अनेक स्क्रीप्टसमध्ये मी गंभीर अभिनयाचं अंगही दाखवलं आहे. पण, येत्या वर्षभरात अशा वेगवेगळ्या भूमिकांमधून मी दिसणार आहे.

**दिग्दर्शन आवडतं का?**

नक्कीच आवडतं. स्किट्स वगैरे मी बसवतोच. दिग्दर्शन करेन, पण त्यासाठी घाई नाही करणार.

**हिंदीत काम करण्याची चांगली संधी आली नाही का?**

गेल्या वर्षी एक सिनेमा केला. ही माझी बॉलिवूडची पहिली फिल्म आहे. तो चित्रपट करोनामुळे अडकला आहे. संघर्षाच्या काळात हिंदी मालिकांत छोटी-मोठी कामं केली आहेत. पण, पूर्ण लांबीचं काम झालेलं नाही हे खरं आहे.

**टीव्ही की नाटक? नाटक**
**मालिका की स्टँडअप कॉमेडी? हास्यजत्रासारखी मालिका**
**अभिनय की लेखन? अभिनय**
**आवडती अभिनेत्री, विशाखा की सई? विशाखा**

## DP UPDATE



फ्रेंड्स... व्हॉट्सॲप, फेसबुकवर डीपी म्हणून तुम्ही एकदम कूल फोटो ठेवता ना? मग तुमचे असे आवडते फोटो ‘डीपी अपडेट’मधून आमच्याशीही शेअर करा. तुमच्या तीन डीपींसोबत तुमचं नाव, तुमच्या आवडी-निवडीही थोडक्यात लिहून आम्हाला मेल करा.
dplikeshare@yahoo.com

CMYK